RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक ४६(५)] गुरुवार, ऑगस्ट २१, २०२५/श्रावण ३०, शके १९४७ [पृष्ठ १, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक ११३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सामान्य प्रशासन विभाग**

राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट २०२५.

**अधिसूचना**

क्रमांक डीआयपी-२०२५/प्र.क्र.२४७/राशि-१.—गुजरात राज्यातील अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनला निघालेले विमान गुरुवार, दिनांक १२ जून, २०२५ रोजी मेघानीनगर येथे कोसळले. या भीषण दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांबद्दल राज्य मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे ठराव पारित करून श्रध्दांजली अर्पण केली :—

एअर इंडियाचे एआय १७१ ड्रिमलायनर विमान उड्डाण केल्यानंतर अवघ्या काही सेकंदात विमानतळ नजीकच्या मेघानीनगरमध्ये कोसळले. या दुर्घटनेत २४० प्रवाशांचा आणि परिसरातील ३५ जणांचा मृत्यू झाला. यात बीजे वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या २४ विद्यार्थ्यांचा समावेश होता. मृतांमध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्यासह १६९ भारतीय, ५३ ब्रिटीश, ७ पोर्तुगीज आणि एका कॅनडाच्या नागरीकाचा समावेश होता. यात महाराष्ट्रातील दहा नागरिकांचा समावेश होता.

या सर्व मृताप्रति आणि त्यांच्या कुटुंबियांप्रति मंत्रिमंडळ तीव्र शोकसंवेदना व्यक्त करत असून मृतात्म्यांना शांती लाभो तसेच त्यांच्या कुटुंबियाना दुःख सहन करण्याची शक्ती लाभो, अशी प्रार्थना करत आहे. या शोक प्रस्तावाद्वारे मंत्रिमंडळ दुर्घटनेतील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**
मुख्य सचिव.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.